SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ०७७ ● पुणे ● शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



अध्यक्षपदी संजय शेटे तर सचिवपदी किरण खुडे 3



'जीबीएस'ची रुग्णसंख्या १३० अन् आतापर्यंत २ मृत्यू 4

# मतदान गायब झालं : राज ठाकरे

## सत्तेत बसलेल्यांनाच शॉक लागलाय : ठाकरेंचे फटकारे

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

"या मतदानावर जाऊ नका, लोकांनी आपल्याला मतदान केलय पण ते आपल्यापर्यंत आलेलं नाही. तुम्ही असं कुठेही मनात धरु नका, लोकांनी मतदान केलं पण त्यांनी केलेलं मतदान कुठेतरी गायब झालं" असं मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले. विधानसभा निवडणूक निकालानंतर राज ठाकरे पहिल्यांदाच बोलले. "अशा प्रकारच्या निवडणुका लढवायच्या असतील तर निवडणुका न लढवलेल्याच बऱ्या. अर्थात ही पण गोष्ट निघून जाईल. कोणी कोणत्या गोष्टीचा अमरपट्टा घेऊन आलेला नसतो. अशा गोष्टी होत असतात" असं राज ठाकरे म्हणाले. "या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर पहिली निवडणूक 1952 मध्ये झाली. तेव्हा संघाची राजकीय विंग जन्माला आली. तिचं नाव जनसंघ. हिंदू, हिंदुत्व या गोष्टी ते मांडत आले. त्याचा विषयच येत नाही. 75 मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी आणली. 77 मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी देशभरात इंदिरा गांधींचा दारूण पराभव झाला" असं राज ठाकरे म्हणाले.

"इंदिरा गांधी पराभूत झाल्या होत्या. मग जनता पार्टी नावाची पार्टी उभी राहिली. त्यात अनेक पक्ष होते. त्यात जनसंघ होते. 1980 मध्ये परत निवडणुका झाल्या. त्यात इंदिरा गांधी विजयी झाल्या. त्यावेळी जनसंघाची भारतीय जनता पार्टी झाली. हा भाजपचा झेंडा दिसतो. तो बदलला. जो जनता पार्टीचा आडवा झेंडा होता, भगवा आणि हिरवा हा त्यांनी उभा केला. 80 साली भाजप निर्माण झाली. वाजपेयी अध्यक्ष झाले. त्यांनी पक्षाची भूमिका बदलली. त्यांनी गांधीवादी समाजवाद ही भूमिका घेतली" असं राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांच्यावर सतत भूमिका बदलण्याची टीका होते. त्यावर राज ठाकरे यांनी भारतीय राजकारणातील घटनांवर उदहारणासह स्पष्टीकरण दिलं.



### सेनेने एकही जागा लढवली नव्हती

**"1984 साली इंदिरा गांधी गेल्या. 78 मध्ये एक निवडणूक झाली. शरद पवारांचं पुलोद आलं. शरद पवार मुख्यमंत्री झाले. ज्यावेळी पुलोद स्थापन केला तेव्हा जनसंघ पुलोदमध्ये होता. शरद पवारांसोबत" असं राज ठाकरे म्हणाले. "75 पासून काँग्रेसच्या आणीबाणीला पाठिंबा दिला होता. 80 च्या निवडणुकीत शिवसेनेने एकही जागा लढवली नव्हती. पण शिवसेना आणि काँग्रेसची युती होती. नंतर पवारांचं सरकार बरखास्त केलं. परत 86 मध्ये पवार काँग्रेसमध्ये आले. जनता पक्ष बाहेरच राहिला. मग मराठीच्या मुद्दयावर शिवसेनेच्या हातात पालिका आली" ही आठवण राज ठाकरे यांनी सांगितली.**

### 'ज्या काँग्रेसला शिव्या घातल्या, त्यांच्यासोबत युती'

**"86 ची निवडणूक झाली. वाजपेयी भाजपचे अध्यक्षच होते. त्यावेळी पार्ल्यात निवडणूक झाली. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर निवडणूक जिंकली गेली. त्यानंतर वाजपेयींना बाजूला केलं. हिंदू हिंदू म्हणून मतदान करू लागला हे भाजपने पाहिलं. संभाजीनगरची निवडणूक झाली. त्यानंतर भाजप शिवसेनेजवळ आली. चर्चा सुरू झाली. 84 मध्ये भाजप शिवसेना युती झाली. सेनेचे दोन उमदेवार कमळावर उभे होते, लोकसभेसाठी. मनोहर जोशी आणि वामनराव महाडीक. 90 ला परत युती झाली. 88 मध्ये पवार मुख्यमंत्री झाले. 95 मध्ये भाजप सेना युतीचं सरकार आलं. आता जर तुम्ही मंत्रिमंडळातील लोकं बघितली तर बहुतेक शिवसेना आणि काँग्रेसचे आहेत. त्यांचं सरकार आहे. त्यांना विचारणार नाही. पण तुमच्या कानात घालणार भूमिका बदलली. भूमिका बदलली. आताच्या पत्रकारांचा किती अभ्यास असतो धन्यच ते" असं राज ठाकरे म्हणाले.**

# धंगेकर, बाबर यांचा शिवसेनेत प्रवेश?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार महादेव बाबर यांनी गुरुवारी (ता. ३०) शिवसेना पक्ष प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लढविले जात आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातील काही पदाधिकारी महायुतीच्या भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील पाच नगरसेवकांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला होता. माजी आमदार बाबर हडपसर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. परंतु ही जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेली होती. बाबर यांनी काही पदाधिकाऱ्यांसमवेत आज पुण्यात शिंदे यांची भेट घेतली. या भेटीमुळे तर्क-वितर्क लढविण्यात येत आहेत. या संदर्भात शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे म्हणाले, "याबाबत आपणांस काही कळविण्यात आलेले नाही. परंतु वरिष्ठ पातळीवर काही घडामोडी सुरू असल्यास त्याची माहिती नाही." तर, कसबा पेठ मतदारसंघाचे माजी आमदार धंगेकर यांनी आज मुंबईत सह्याद्री अतिथिगृहात शिंदे यांची भेट घेतली. मात्र, या भेटीत मतदारसंघातील प्रश्नांबाबत चर्चा झाली, असे धंगेकर यांनी सांगितले.



पाहिजेत
एस. के. फॅब्रिकेटर्स, कर्वेनगर, पुणे
1) ऑर्गन वेल्डर
2) शीटमेटल फिटर
3) हेल्पर
4) आर्क वेल्डर
5) फिनिशर
6) पॉलिशर
स्किल्ड् लेबर टीम किंवा लेबर सप्लायर्स पाहिजेत
९८८१००८५३२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

# दादांनी केला शिवतारेंचा गेम

## आमदार विजय शिवतारे यांचं नाव जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदावरून वगळले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यात सत्ताधारी असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार विजय शिवतारे यांना जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) सदस्य पदावरून वगळण्यात आले आहे. जिल्ह्यात शिवतारे हे शिवसेना (शिंदे) पक्षाचे एकमेव आमदार असतानाही त्यांना संधी न दिल्याने महायुतीत नाराजी पसरली आहे. आमदार शिवतारे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील वादामुळे शिवतारे यांना डावलले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यासह भाजपचे दौंडचे आमदार राहुल कुल यांना संधी देण्यात आली आहे.

महायुतीत भाजपचे मित्रपक्ष म्हणून सहभागी असलेले शिवसेना (शिंदे) पक्ष आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पालकमंत्री पदावरून वाद सुरू आहे.

रायगडचे पालकमंत्रिपद महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांना देण्यात आले होते. त्यावरून शिवसेना (शिंदे) पक्षाचे रोजगार हमी, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रायगडचे पालकमंत्री पद रिक्त ठेवले आहे.



जिल्हा नियोजन समितीमध्ये जिल्ह्यातल्या कोणत्या आमदारांना मतदारसंघातील विकासासाठी किती निधी मिळणार हे ठरविले जाते. या समितीमध्ये सदस्य म्हणून काम करणाऱ्यांना आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी निधी मिळतो. पुरंदरचे आमदार शिवतारे हे पुणे जिल्ह्यातील शिवसेना (शिंदे) पक्षाचे एकमेव आमदार आहेत.

राज्यात महायुतीची सत्ता असल्याने प्रत्येक पक्षाच्या किमान एका आमदाराला जिल्हा नियोजन समितीत सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळेल, असे अपेक्षित होते.

पुणे जिल्ह्यात शिवसेनेच्या वाट्याला एकही मंत्रिपद आलेले नाही. त्यामुळे किमान जिल्हा नियोजन समितीवर तरी शिवसेनेला संधी दिली जाईल, अशी चर्चा असताना शिवतारे यांना डावलल्याने महायुतीत सारे काही आलबेल नसल्याचे समोर आले आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत सुरुवातीच्या काळात विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या विरोधात लढण्याची तयारी केली होती. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप करत शिवतारे यांची समजूत काढून उमेदवारी मागे घेण्यास लावली.

मात्र या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला. विधानसभेच्या निवडणुकीत पुरंदरची जागा महायुतीमध्ये शिवसेनेच्या वाट्याला आलेली असतानाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिवतारे यांच्या विरोधात या मतदारसंघात उमेदवार उभा केला होता. या निवडणुकीत शिवतारे यांचा विजय झाला. तर अजित पवारांच्या उमेदवाराचा पराभव झाला. अजित पवार पालकमंत्री झाल्याने महायुतीत असतानाही आमदार शिवतारे यांना जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदावरून वगळण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुमार...



देशभरातील ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मांडणारा अॅन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट म्हणजे 'असर'चा १४वा अहवाल मंगळवारी प्रसिद्ध झाला. या अहवालातून राज्यातील ग्रामीण भागातील सरकारी शाळांमधील शिक्षणाचे भयाण वास्तव समोर आले आहे. राज्यातील ३३ जिल्ह्यांमधील ९८७ गावांमध्ये वय वर्षं ३ ते १६ मधील ३३ हजार ७४६ विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात पूर्व प्राथमिक (वयोगट ३-५), प्राथमिक (वयोगट ६-१४) आणि मोठी मुले (वयोगट १५-१६) या गटांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्यात, राज्यातील सरकारी प्राथमिक शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांचा टक्का दिवसेंदिवस घसरत असल्याची बाबही दिसून आली आहे.

२०२२च्या तुलनेत २०२४ मध्ये तब्बल साडेसहा टक्क्यांनी विद्यार्थी संख्या घटल्याची महत्त्वपूर्ण आकडेवारी समोर आली आहे, ही चिंताजनक बाब आहे. २०१९च्या कोरोना काळानंतर विद्यार्थी संख्या घटत असल्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यामुळे सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्याची पालकांची मानसिकताच नसल्याची धक्कादायक माहिती असर संस्थेच्या अहवालात नमूद आहे. याउलट आयसीएससी, सीबीएससी या केंद्रीय बोर्डाचे शिक्षण चांगले आहे, असा मानणारा मोठा पालक वर्ग तयार झाला आहे. त्यामुळे, महाराष्ट्र राज्याच्या एसएससी बोर्डाचे शिक्षण हे येत्या काही वर्षांत कितपत स्पर्धेत टिकेल, यावरून वेगळी चर्चा ऐकायला मिळत आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याबरोबर त्या शिक्षणाचा दर्जा राखला जावा ही सरकारची जबाबदारी आहे. देशाच्या राज्य घटनेत तशी तरतूद आहे; परंतु ग्रामीण भागातील शाळांच्या पायाभूत सुविधांबरोबर गुणवत्तेबाबत सरकारी पातळीवर उदासीनता दिसून येते. खरं तर सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा या तर भारतीय शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा आहे. याच शाळांनी खऱ्या अर्थाने देशात आणि राज्यात शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविले आहे. शाळांच्या सुविधांचा कायापालट करण्याबरोबर शाळेमध्ये



उत्तम शिक्षणासाठी शिक्षकांची उपलब्धता फार महत्त्वाची आहे, याकडे सरकारने लक्ष द्यायला हवे.

शैक्षणिक गुणवत्तेचा विचार केला तर राज्यात इयत्ता ८वी मधल्या २५ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेतील उतारा वाचता येत नव्हता. त्याशिवाय आठवीच्या ४० टक्के विद्यार्थ्यांना वजाबाकी व भागाकार ही आकडेमोड करणे शक्य होत नव्हते, हे भीषण वास्तव यानिमित्ताने समोर आले. दुसऱ्या बाजूला मात्र, इयत्ता ८वीतील खासगी शाळेतील मुले सरकारी शाळेतील मुलांपेक्षा भागाकारात चांगली कामगिरी करत असल्याचे दिसून आले. अक्षर ओळख या निकषावर इयत्ता पहिलीतल्या २६ टक्के विद्यार्थ्यांना एकही अक्षर ओळखता येत नाही. एवढेच कशाला तर इयत्ता आठवीतील १ टक्के विद्यार्थी एकही अक्षर ओळखू शकले नाही, तर साडेसहा टक्के विद्यार्थ्यांना शब्दांची ओळख असली, तरी पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेच्या पातळीचे उतारेही त्यांना वाचता आले नाहीत. १४ टक्के विद्यार्थी जेमतेम पहिल्या इयत्तेपर्यंतचा उतारा वाचू शकले, तर ७४.२ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेचा उतारा वाचता आला. राज्यातील सरकारी शाळांमधील तिसरी ते पाचवीच्या ५०% विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तकही वाचता येत नाही, हे वास्तव या अहवालाच्या रूपाने पुढे आले. जिल्हानिहाय शालेय शिक्षणाची स्थिती यामध्ये मुख्यत्वे अंकगणित, अक्षर ओळख, वाचन त्यासोबतच डिजिटल शिक्षण या सगळ्यांची सद्यस्थिती आकडेवारी या सर्वेतून मांडली गेली आहे. मात्र, विद्यार्थ्यांना स्मार्टफोन हा आता आपल्या आयुष्याचा एक भाग वाटत आहे, त्याचा सोशल मीडियामधील सहभाग वाढला आहे, असे चित्र आपल्याला दिसते. त्याचे प्रतिबिंब या अहवालात दिसले.

१४ ते १६ वयोगटातील ९४ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहेत. त्यापैकी ७० टक्के विद्यार्थी ते स्मार्टफोन चाचणीसाठी आणू शकले. १९ टक्के विद्यार्थ्यांकडे स्वतःचा स्मार्टफोन आहे. यापैकी ६३ टक्के विद्यार्थी शैक्षणिक कामांसाठी स्मार्टफोन वापरतात, तर ७२ टक्के विद्यार्थी सोशल मीडियावर सक्रिय राहण्यासाठी स्मार्टफोन वापरतात असे दिसून आले आहे. विद्यार्थ्यांच्या हातात स्मार्ट फोन असताना, ते त्याचा वापर नक्की काय पाहण्यासाठी करतात, यावर ना पालकांचे नियंत्रण, ना शिक्षकांचे. त्यामुळे अल्पवयीन मुलांकडील मोबाईल हे त्याच्या आयुष्यासाठी घातक ठरते आहे का, हे तपासण्याची यंत्रणा नाही, हे सत्य स्वीकारायला हवे. तसेच महाराष्ट्र राज्य हे शिक्षणात अग्रेसर म्हणतो, ते फक्त आता कागदावर राहिले नाही. महाराष्ट्रापेक्षा मागे असलेल्या मेघालय, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि तामिळनाडूसारख्या राज्यांनी शिक्षणात सुधारणा केली असल्याचे अहवालातून उघड झाले आहे. आता या अहवालानंतर पालकवर्ग मुलांना शाळेत का पाठवतो, वरच्या वर्गात जाऊनही, लिहिता-वाचता न येणाऱ्या मुलांचे काय होणार? ṇअर्धशिक्षित पिढी आपण निर्माण करत आहोत का? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण होत आहेत. हा दोष पालकांचा, शिक्षकांचा की शिक्षणव्यवस्थेचा आहे, हा सुद्धा चर्चेचा विषय होऊ शकतो; परंतु विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी जी तत्परता राज्य सरकारने दाखवली तीच तत्परता राज्यातील ग्रामीण भागात शिकणाऱ्या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी दाखविण्याची गरज आहे.

# नऱ्हेत "रंगला खेळ पैठणीचा" कार्यक्रम" संपन्न

## मा. आदर्श सरपंच पोपटराव खेडेकर यांचे आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे गावचे माजी आदर्श सरपंच व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पुणे शहर उपाध्यक्ष पोपटराव खेडेकर यांच्या आयोजनातून आयोजित मकर संक्रांति निमित्त, हळदी कुंकू समारंभ तसेच होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम भैरवनाथ मंदिराजवळ नरेगाव या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमानिमित्त भव्य लकी ड्रॉ पाच बक्षीस व खेळ पैठणीच्या कार्यक्रमासाठी चार बक्षीस ठेवण्यात नरेगाव आणि परिसरातील सर्व महिला भगिनी मोठ्या संख्येने गर्दीचा उच्चांक केला. या कार्यक्रमाचे आयोजन नऱ्हेगावचे मा.आदर्श सरपंच पोपटराव खेडेकर यांनी केले होते.

या कार्यक्रमासाठी माजी आमदार कुमार भाऊ गोसावी, खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी पुणे शहर अध्यक्ष स्वातीताई पोकळे, हवेली तालुका माजी सभापती प्रभावती ताई भूमकर, शहर संघटक नंदूभाऊ जगताप, मा. जिल्हा परिषद सदस्य अनिताताई इंगळे, खडकवासला मतदारसंघाच्या महिला अध्यक्ष राजेश्वरी ताई पाटील, माजी पंचायत समिती सदस्य ललिता ताई कुटे, माजी ग्रामपंचायत सदस्य सुप्रियाताई भूमकर, माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेखाताई पवार, सरचिटणीस राष्ट्रवादी महिला सुषमाताई भडावळे व पुणे शहरातील महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच इतर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमासाठी विशेष आकर्षण असे प्रसिद्ध अभिनेत्री जोशना सपकाळ याही आवर्जून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे खेळ पैठणीचे निवेदन अभिनेते प्रकाश दिंडले यांनी केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र सिनारे यांनी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये हा होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न झाला.



## गावाचा विकास करण्यासाठी नक्कीच चांगला प्रयत्न : विलासदादा गाटे

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

सारोळे ता.बार्शी ह्या गावातील चांगल्या प्रकारे कामे सुरू आहेत. आणि आगामी काळामध्ये विविध कामे करून चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल असे मत माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे यांनी केले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त ग्रामपंचायत सारोळे प्रजासत्ताक दिन कार्यक्रम साजरा झाला त्यावेळी त्यांनी मत व्यक्त केले. ग्रामपंचायतीच्या मार्फत विविध रस्ते यांचे मजबुतीकरणाचे काम झाले आहे. सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्राथमिक शाळेच्या खोल्यांचे काम सुरू झाले आहे. चांगली कामे आगामी काळामध्ये नक्की केली जातील असे त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या ध्वजारोहण गावच्या सरपंच सौ. सुवर्णा सुशांत काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील ध्वजारोहण शालेय समितीचे अध्यक्ष कोंडीराम गाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तंटामुक्ती अध्यक्ष अरुण पाटील हे उपस्थित होते. यावेळी उपसरपंच जितेंद्र चौधरी तलाठी, पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे,ग्रामपंचायत सदस्य मनीषा गाटे, प्रेमला गाटे,संदीप साबळे ,रेखा साबळे, मथुरा गाटे,

अंगणवाडी सेविका सौ. प्रमिला मुंबरे, प्रतिभा साबळे, कोतवाल मसा साबळे, ऑपरेटर गजानन बोधले, ग्रामपंचायत शिपाई विजय महापुरे ,लक्ष्मण ठोंबरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोथरुडमध्ये कोयता गँगची दहशत; भर रस्त्यावर दुचाकी चालकावर हल्ला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास कोथरुड मधील सागर कॉलनी भाजी मार्केट येथे एका व्यक्तीवर तीन ते पाच युवकांनी कोयत्या सारख्या धारदार शस्त्रांनी वार केले. वार केल्यानंतर हल्लेखोर सागर कॉलनीतील गल्लीमध्ये जोरात ओरडा करत, कोयते नाचवत पळाले. या घटनेमुळे कोथरुड मध्ये दहशत पसरली आहे. सागर कॉलनी डीपी रस्त्यावर भाजी मंडई भरते. भाजी खरेदी व विक्रीसाठी आलेल्यांमुळे हा रस्ता सायंकाळी गजबजलेला असतो. त्यामुळे येथे नेहमी वाहतुक कोंडी होते. नेमके अशावेळी घडलेल्या या थरारक घटनेच्या प्रत्यदर्शीने सांगितले की, येथे असलेल्या कच्छी दबेलीच्या हातगाडी पाशी दुचाकीवर थांबलेल्या युवकावर कोयता घेवून आलेल्यांनी आरडाओरडा करत जोरदार वार केले.

येथे असलेले शेकडो लोक या घटनेमुळे अचंबित झाले. एका भाजी विक्रेत्या महिलेला भोवळ आली. कच्छी दाबेलीवाला व जवळचे दुकानदार पळून गेले. काही लोकांनी पोलिसांना फोन केला. पण पोलिस येई पर्यंत गुन्हेगार युवक पळून गेले होते.

यासंदर्भात कोथरुड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक संदीप देशमाने म्हणाले की, हा गँगवॉरचा प्रकार नाही. संबंधितांना आम्ही ताब्यात घेतले आहे. घटनेचा तपास सुरु आहे. एक जण गंभीर जखमी झालेला आहे.

**या घटनेमुळे कोथरुड मध्ये वेगवेगळ्या चर्चेना उधाण आले. अल्पवयीन युवकांकडून गुंड लोक गुन्हे घडवून आणत आहेत. कोथरुड सुरक्षित आहे का, पोलिस ठाणे जवळ असूनही अशा घटना घडतात, एवढे लोक तेथे असून एकालाही त्या युवकाला वाचवण्याची हिम्मत झाली नाही. पोलिसांना पोहचायला वेळ लागतो ही चिंताजनक बाब आहे.**

# खडकवासला धरणातील पाणी पिण्यास अयोग्य

- पाण्यात आढळले 'हे' जिवाणू



**पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही शुद्ध पिण्याचे पाणी ही मिळत नसेल तर प्रशासन करते तरी काय? समाविष्ट गावांना शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने जबाबदारी घेऊन नागरिकांच्या जीवाशी चाललेला हा खेळ थांबवावा..**
**- नरेंद्र हगवणे, माजी उपसरपंच किरकटवाडी**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या वाढत आहे. जीबीएस च्या रुग्णांची वाढ ही दूषित पाण्यामुळे झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुणे शहरात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या वाढत आहे. जीबीएस च्या रुग्णांची वाढ ही दूषित पाण्यामुळे झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाकडून पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासले जात आहे. सिंहगड रस्ता परिसरातील जलस्रोतांसह खडकवासला धरणातील पिण्याच्या पाण्याची तपासणी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून करण्यात आली. या तपासणीमधून समोर आलेले निष्कर्ष धक्कादायक आहेत.

खडकवासला धरणातील पाण्याच्या नमुन्यात ई-कोलाय आणि कॉलिफॉर्म हे जीवाणू आढळल्याचे या तपासणीमध्ये समोर आले आहे. त्यामुळे प्रक्रिया न करता धरणातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले आहे.

ई-कोलाय आणि कॉलीफॉर्म हे जीवाणू उष्ण रक्ताच्या प्राण्यांच्या विष्ठेमध्ये आढळतात. या प्राणीविष्ठेमुळे जलस्त्रोत दूषित झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे हे पाणी दूषित झाले आहे. असे पाणी प्रक्रिया न करता पिल्यास् त्यातून आरोग्याला धोका होऊ शकतो, असे सांगितले जात आहे.



## पीएमपीएमएलचा चालक दिन उत्साहात साजरा

**पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) : पुणे महानगर परिवहन महामंडळ लि . चालक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. पी एम पी एल च्या व्यवस्थापकीय संचालक सौ.दिपा मुधोळ मुंडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा चालक दिन कार्यक्रम पार पडला. धायरीतील मारुती मंदिर बस स्थानक सिंहगड रोड या ठिकाणी चालक दिन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी धायरी मारुती मंदिर बस स्थानकाचे प्रमुख वाहतूक नियंत्रक मा .रवींद्र डावरे साहेब यांच्या हस्ते व स्वारगेट आगार प्रमुख मा शैलेंद्रजी नाईक, वाहक तानाजी कांबळे व प्रवासी श्रेयस प्रभू देसाई ,अनिल कोंडीबा, प्रवीण बिरादार हे यावेळी उपस्थित होते. यावेळी चालक विलास क्षीरसागर यांचा श्रीफल व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. श्री.क्षीरसागर यांनी गेले पंधरा ते वीस वर्षे विना अपघात सेवा पी एम पी एल मध्ये केलेली आहे. याबद्दल त्यांचा सन्मान केला. यावेळी मनोगत व्यक्त करताना वाहक तानाजी कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना बस चालकांची बांधवाचे कौतुक व्यक्त केले. प्रवास करताना प्रवाशांनी तसेच इतर वाहन चालकांनाही त्यांना सहकार्य करून त्यांनाही समाधान दिले पाहिजे. अशी भावना बोलून दाखवली. तसेच चालकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .यावेळी इतर प्रवासी मित्र व कर्मचारी उपस्थित होते.**

## हुंडाबळी प्रकरणात पतीसह सासू-सासऱ्याला सात वर्षे कारावास

**पुणे (आरंभ पर्व) : हडपसर भागातील विवाहितेच्या हुंडाबळी प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी पती आणि सासू-सासऱ्यास सात वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने गुरुवारी (ता. ३०) हा आदेश दिला.आरोपी पती संतोष विठ्ठल पवार (वय-४२), सासरा विठ्ठल तुकाराम पवार (वय-७१) आणि सासू मंगल विठ्ठल पवार (वय-६५, सर्व रा. लक्ष्मी कॉलनी, हडपसर) अशी आरोपींची नावे आहेत.**



# ७६ वृक्षांची लागवड

## डिवाईन जैन ग्रुपचा पुढाकार

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त डिवाईन जैन ग्रुपतर्फे आयकर विभागाच्या कार्यालयात ७६ वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रधान मुख्य आयकर आयुक्त रीना झा त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य हेतू प्रजासत्ताक दिनाचा उत्सव निसर्गाच्या सान्निध्यात साजरा करणे हा होता. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण हा महत्त्वाचा भाग आहे. केवळ वृक्षांची लागवड करून थांबणार नाही, तर त्यांच्या देखभालीची जबाबदारीही घेतली जाणार आहे.

ही वृक्षलागवड डिवाईन जैन ग्रुप व सेवायोग फाउंडेशनच्या समन्वयाने करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण महत्त्वाचे नसून, त्यांचे योग्य प्रकारे संगोपन आणि संवर्धन होणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे या वृक्षांची जबाबदारी संस्थेने घेतली आहे.

कार्यक्रमास संग्राम गायकवाड (प्रधान आयकर आयुक्त), अमित बोबडे (आयकर आयुक्त, पुणे), सोमनाथ वाजळे (अतिरिक्त आयकर आयुक्त, पुणे), किरण शिंदे (उप आयकर आयुक्त, मुख्यालय, प्रशासन, पुणे), शेखर पवार (आयकर अधिकारी, मुख्यालय, प्रशासन, पुणे) व मान्यवर उपस्थित होते. डिवाईन जैन ग्रुपचे अध्यक्ष संकेत शाह, भूषण कर्णावट, प्रियंका शहा, चेतन जैन, मेहुल शहा, हर्षल नवलक्खा, तनिष जैन, श्रेयांश पांडे व सेवायोग फाउंडेशनचे अक्षय कचरे, आदित्य ढवळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**आजच्या काळात वाढते प्रदूषण आणि पर्यावरणावर होणारा ताण लक्षात घेता, वृक्षारोपणासारखे उपक्रम गरजेचे आहेत. डिव्हाइन जैन ग्रुप आणि सेवायोग फाउंडेशनच्या पुढाकारामुळे निसर्गसंवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले. भविष्यातही असेच सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचा संकल्प डिवाईन जैन ग्रुप ने केला आहे.**

या सर्वांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने प्रजासत्ताक दिनानिमित्त पर्यावरण पूरक सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

## सदस्य नोंदणी मोहिमेमध्ये अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी वेधले लक्ष



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश ने संघटन पर्व या ऑनलाइन सदस्य मोहिम सुरू केली आहे. त्यामध्ये पुणे मनपाचे माजी उपमहापौर अॅड. प्रसन्न दादा जगताप यांनी सर्वांचे चांगले लक्ष वेधले आहे. त्यांनी रेफरल कोड द्वारे आतापर्यंतसुमारे दोन हजार सदस्य जोडले आहेत. अजूनही त्यांचे सदस्य जोडणी म्हणून चालूच आहे. भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व हे सदस्यता नोंदणी मोहीम सुरू आहे.

पुणे शहरातून होणाऱ्या नोंदणीकडे वरिष्ठांचेही लक्ष असणार आहे. अॅड. प्रसन्नदादा जगताप या मोहिमेतील चांगल्या कामगिरीबद्दल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशस्तीपत्रकाद्वारे त्यांचे अभिनंदन केले आहे. अॅड. प्रसन्नदादा जगताप हे गेली अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे काम करत आहेत. पुणे महानगरपालिकेचे उपमहापौरपदही त्यांनी भूषवले आहे .

हिंगणे सिंहगड रोड भागामध्ये नगरसेवक म्हणून त्यांनी चांगली कामगिरी केली आहे. अॅड. प्रसन्नदादा जगताप यांनी भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक उपक्रमामध्ये भरीव योगदान देण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाचे चांगल्या प्रकारे त्यांनी काम केले आहे. शिवाय पुणे मर्चंट को.बँकेचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

# थोडक्यात

## एयर इंडिया मार्च २०२५ पासून तेल अविवपर्यंत विमानसेवा सुरू करणार

गुरुग्राम (आरंभ पर्व) : एयर इंडियाने आज दिल्ली आणि तेल अविव दरम्यान नॉन- स्टॉप सेवा २ मार्च २०२५ पासून परत सुरू करणार असल्याचे जाहीर केले. एयर इंडियाद्वारे तेल अविव येथे आठवड्याला पाच वेळा सेवा दिली जाईल व त्यासाठी बोईंग 787-8 ड्रीमलायनर एयरक्राफ्टचा वापर केला जातो. या विमानात बिझनेस क्लासमध्ये १८ फ्लॅट बेड्स आणि इकॉनॉमी क्लासमध्ये २३८ प्रशस्त, कुशन्ड सीट्सचा समावेश आहे. दिल्ली आणि तेल अविवदरम्यानच्या विमानसेवेचे बुकिंग सर्व चॅनेल्सवर Air India's website खुले असून त्याशिवाय मोबाइल अप, ट्रॅव्हल एजंट्स यांचाही समावेश आहे. दिल्ली- तेल अविव मार्गावर सेवा परत सुरू करण्याचा एयर इंडियाचा निर्णय आवश्यक मंजुरीनुसार आहे.

दिल्ली आणि तेल अविव दरम्यान विमानसेवेचे वेळापत्रक

| फ्लाइट # | सेवेचे दिवस | सेक्टर | निर्गमन | आगमन |
|---|---|---|---|---|
| AI139 | सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, रविवार | दिल्ली-तेल अविव | 1555 Hrs | 1925 Hrs |
| AI140 | सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, रविवार | तेल अविव-दिल्ली | 2110 Hrs | 0610 Hrs+1 |

## प्रसिद्ध गायक राजेश दातार यांच्या गीतांचा मैफलीला उदंड प्रतिसाद



पुणे (आरंभ पर्व) : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल मराठी भक्ती गीते, भाव गीते, चित्रपट गीते प्रसिद्ध गायक राजेश दातार, सन्मिता धापटे - शिंदे यांनी सादर केली. यामध्ये त्या फुलांच्या गंधकोशी, निजरुप दाखवा हो, माझे माहेर पंढरी, अशी चिकमोत्याची माळ, अबीर गुलाल उधळीत रंग, केतकीच्या अशी सदाबहार गीते सादर करण्यात आली. प्रसिद्ध गायक राजेश दातार व सन्मिता धापटे - शिंदे यांनी भावगीते, भक्तिगीते, गवळण, लावणी, भजन देखील सादर केली. त्यातील अनेक गीतांना रसिकांची उत्स्पूर्थ दाद मिळाली. श्री तुळशीबाग गणपती मंडळ ट्रस्टच्यावतीने भावतरंग भक्तीगीत व भावगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी दृष्टिहीन असलेल्या अद्वेत मराठे या गायकाने तुझे गीत गाण्यासाठी हे गीत गावून उपस्थितांची मने जिंकून घेतली. तबला - विनीत तिकोनकर, हार्मोनियम - प्रसन्न बाम, सिंथेसायझर - केदार परांजपे, विविध तालवाद्य साथसंगत - धनंजय साळुंखे सदरील वादकांनी मोलाची साथ दिली. तर कार्यक्रमाचे निवेदन मिलिंद कुलकर्णी यांनी केली.

## 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' १८ एप्रिलला भेटीला

पुणे (आरंभ पर्व) : बुद्धिमान, ज्ञानी अशा संतांना आपल्या प्रखर विद्वत्तेने आणि अधिकारवाणीने गुरुमंत्र देऊन ही शलाका तळपती झाली. अशा संत मुक्ताबाईंचे आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रेरणादायी चरित्र उलगडून दाखवणारा दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा भव्य मराठी चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे. आदिमाया आदिशक्ती संत मुक्ताईला भेटूया १८ एप्रिल २०२५ पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात.. अशा कॅप्शनसह आलेल्या या पोस्टरमधून चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. या पोस्टरमध्ये संत 'मुक्ताई' विठूरायाची आराधना करताना दिसते आहे. देहरूपाने संपले तरी कार्यरूपाने संजीवन असणाऱ्या मुक्ताबाईंच्या कार्य व विचारांना जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी मुक्ताई'ने निभावलेल्या माता ,भगिनी, गुरु अशा विविध भूमिकांचे पदर 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटातून उलगडणार आहेत. स्त्री-पुरुष भेदापलीकडे जगणे शिकविणाऱ्या संत मुक्ताईंचा खडतर आणि भक्तीरसाने परिपूर्ण जीवनप्रवास आजच्या पिढीला ज्ञात व्हावा यासाठी 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा वेगळा प्रयत्न केल्याचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर सांगतात. संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांनी सांभाळली आहे. छायांकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे.

### खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजय शेटे

# सचिवपदी किरण खुडे

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संजय शेटे यांची तर सचिवपदी किरण खुडे यांची निवड करण्यात आली.

खेड तालुका पत्रकार संघाची वार्षिक सभा येथील खेड पंचायत समितीच्या राजा शिवछत्रपती सभागृहात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष सुनिल थिगळे होते.

सभेच्या प्रारंभी दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहन सिंग, ज्येष्ठ पत्रकार भरत अवचट, पद्मश्री डॉ.मनोहर डोळे, मराठी साहीत्य संमेलनाचे माजी अध्यक्ष नरेंद्र चपळगावकर, संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील जेष्ठ किर्तनकार ह.भ.प. किसन महाराज साखरे, सिमेवरील शहीद जवान व दिवंगत ज्ञातअज्ञात देश बांधवांना श्रद्धांजली अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त व जमाखर्चाची माहिती सचिव किरण खुडे यांनी सभेला दिली. त्यास एकमताने मंजुरी देण्यात आली.



मा. संजय शेटे



मा. किरण खुडे

या सभेत पुढील वर्षासाठी अध्यक्षपदी संजय शेटे यांची बिनविरोध तर सचिवपदी किरण खुडे यांची फेरनिवड करण्यात आली.

शेटे यांना सर्वानुमते कार्यकारिणी निवडीचे अधिकार देण्यात आले. त्यानुसार अध्यक्ष- संजय तुकाराम शेटे (लोकमत), कार्याध्यक्ष- रोहिदास गाडगे (साम टिव्ही मराठी), उपाध्यक्ष - रामचंद्र सोनवणे (प्रभात), ॲड. निलेश आंधळे (संपादक पुणे ब्रेकिंग न्युज), सचिव - किरण खुडे (केसरी), सहसचिव - रोहिदास होले (संपादक खेड टाईम्स), कोषाध्यक्ष- आदेश भोजणे (पुढारी), सहकोषाध्यक्ष - अशोक कडलक (प्रभात), प्रसिद्धी प्रमुख - इसाक मुलाणी (पुढारी), सल्लागार- दत्तात्रय भालेराव (पुढारी), सुनिल थिगळे (टि.व्ही ९ मराठी), बाळासाहेब सांडभोर (संपादक नॅशनल मराठी न्यूज), महेंद्र शिंदे (सकाळ), विद्याधर साळवे (राष्ट्रनिर्माण), राजेंद्र लोथे (सकाळ), वनिता कोरे (सकाळ), संदिप मिरजे (प्रभात), कार्यकारिणी सदस्य - नाजीम इनामदार (गावकरी), अतुल भालेराव (पुण्यनगरी), सदाशिव आमराळे (नवराष्ट्र), किशोर गिलबिले (पुण्यनगरी), प्रभाकर जाधव (नवराष्ट्र), सोमनाथ नवले (प्रभात), सुभाष लोहोट (प्रभात), अय्याज तांबोळी (लोकमत), रवि साकोरे (नवराष्ट्र)

तालुक्यातील पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या संघाचे अध्यक्षपद मला सर्व सहकाऱ्यांनी सोपवले त्याबद्दल मी आभारी आहे. बोलण्यापेक्षा कामावर माझा भर राहील. भावी काळात पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, पत्रकारांसाठी कार्यशाळा, आरोग्य शिबिर आदी उपक्रम राबविणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष शेटे यांनी सांगितले. याप्रसंगी मान्यवरांची भाषणे झाली.

सर्व नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाला आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहीते, भाजप पुणे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, अतुल देशमुख तसेच तालुक्यातील अधिकारी व नागरिकांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुलांना 'माणूस' करण्याचे आव्हान

### जेष्ठ पत्रकार संजय आवटे यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



हल्ली पालकांनी आपल्या मुलांना करिअरचे घोडे केले आहे. नवी पिढी अधिक बुध्दिमान असून त्यांना मुक्त अवकाश देण्याची गरज आहे. त्यांना आवडत्या क्षेत्रात हवं ते करू द्यायला हवं. या नव्या पिढीच्या भाषेत संत ज्ञानदेव, संत तुकाराम यायला हवेत. त्यांच्यापर्यंत शाहू फुले आंबेडकरांचा वैचारिक वारसा पोचवायला हवा. यासाठी मुलांना माणूस करण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर असल्याचे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार संजय आवटे यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगूरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, सभापती विजयसिंह शिंदे, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संजय आवटे पुढे म्हणाले की, शाश्वत विकास म्हणजे सार्वजनिक नळाला येणारे पाणी डोळे झाकून पिता यायला हवे. सार्वजनिक आरोग्य व वाहतूक व्यवस्थेचा वापर श्रीमंतांनी करायला हवा. महिलांना रस्त्यावर मोकळेपणाने फिरता, रमायला हवे. विकासाचा केंद्रबिंदू सामान्य माणूस असावा. सध्याच्या काळात स्त्री-पुरष व जाती-धर्मातील संघर्षाचे मोठे आव्हान असून सामाजिक सलोखा आवश्यक आहे. महापुरुषांना जाती-जातीत अडकवून न ठेवता सर्वधर्मसमभावाचा वारसा सांगणारा खरा भारत पुढच्या पिढीपर्यंत पोचवायला हवा, असे ते म्हणाले. नव्या पिढीला माध्यमांची भाषा अवगत असून माध्यम तुम्हाला अभिव्यक्ती देते पण विचार करायला शिकवत नाही, असे त्यांनी सांगितले. एखाद्या घटनेबद्दल तुमच्या मनातील प्रतिक्रियेवरून तुम्ही काय होणार हे अवलंबून असते. त्यासाठी सकारात्मक विचार करा, मानवता जपा, बोलण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवा असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्वेतांबरी मांडे, परिचय डॉ. संजय शिंदे व आभार सानिया हजारे या विद्यार्थिनीने मानले.

## सेंट पॅट्रिक्स एचएसच्या शौर्य मेंगेचे तब्बल १८ गोल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेंट पॅट्रिक्स एचएसच्या शौर्य मेंगेचे तब्बल 18 गोल करताना सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग 2024-25 हॉकी स्पर्धेचा तिसरा आठवडा गाजवला. सेंट व्हिन्सेंटच्या मैदानावर, शनिवारी, सेंट पॅट्रिक्स 'अ' संघाने सेंट पॅट्रिक्स 'ब' संघाचा २१-० असा धुव्वा उडवला. या लीगमधील सर्वाधिक गोल फरकाने मिळवलेला हा विजय ठरला. शौर्यने विक्रमी 18 गोल करत मोठ्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. प्रणव अहिरने 3 गोल करताना त्याला चांगली साथ दिली. दरम्यान, लोयोला एचएस 'ब' संघाने दोन विजय मिळवले. लोयोला 'ब' ने पहिल्यांदा स्कायलर सुसॅनिथन (2) आणि राजवीर सिंग (1) यांच्या गोलच्या जोरावर लोयोला एचएस 'अ' संघाला 3-0 अशा फरकाने हरवले. त्यानंतर स्कायलर सुसॅनिथन (5), मार्क दास आणि साईराज शिंदे (प्रत्येकी 4) यांच्या सर्वोत्तम कामगिरीच्या बळावर सेंट पॅट्रिक्स 'ब' संघाचा 13-0 असा पराभव केला. अन्य सामन्यांत, सेंट व्हिन्सेंट 'अ' संघाने सेंट व्हिन्सेंटच्या 'ब' ला ४-१ असे पराभूत केले. शार्दुल कांबळे (2), ॲरेन सिल्वा आणि क्लाईड अँड्र्यूजने (1) त्यात मोलाचा वाटा उचलला. प्रतिस्पर्धी संघाकडूनएकमेव गोल प्रणव गंडलेने केला.

## आमिर खानच्या उपस्थितीत रंगला 'इलू इलू'चा प्रिमियर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फाळके फिल्म्स एण्टरटेन्मेंट प्रॉडक्शन आणि अजिंक्य फाळके दिग्दर्शित 'इलू इलू' या चित्रपटाची सध्या बरीच चर्चा सुरू आहे. नुकताच या चित्रपटाचा शानदार प्रीमियर सोहळा बॉलीवूड स्टार आमिर खान यांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवरांनी या प्रिमियर सोहळ्याला आवर्जून हजेरी लावली. फाळके या नावातच एक स्पार्क आहे. अतिशय सुंदर चित्रपट अजिंक्य फाळके यांनी केला असल्याचे आमीर खान यांनी यावेळी सांगितले'. चित्रपटाची निर्मीती आणि अजिंक्य फाळके यांच्या दिग्दर्शनाचे मनापासून कौतुक करत चित्रपट पसंतीची



पोचपावती आमिर खान यांनी यावेळी दिली. उत्तम कथा असल्यास एखादा मराठी चित्रपट करायला नक्कीच आवडेल असं आमिर खानने याप्रसंगी आवर्जून सांगितलं. 'आमिर खान सरांचं मार्गदर्शन या चित्रपटासाठी लाभलं ते आमच्यासाठी मोलाचं होतं. त्यांची ही कौतुकाची थाप आमचा हुरूप वाढवणारी असल्याचं दिग्दर्शक अजिंक्य फाळके याने यावेळी सांगितलं'.

'इलू इलू' या चित्रपटाबाबत तरुण वर्गामध्ये विशेष उत्सुकता पहायला मिळतेय. चित्रपटाच्या गाण्यांनी आणि संगीताने याआधीच प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत.

'इलू इलू' चित्रपटात बॉलीवूड गाजवलेली प्रसिद्ध अभिनेत्री एली आवराम सोबत वीणा जामकर, आरोह वेलणकर,वनिता खरात, मीरा जगन्नाथ, आनंद कारेकर, श्रीकांत यादव, कमलाकर सातपुते, अंकिता लांडे, गौरव कलुस्ते, निशांत भावसार, यश सणस, सोहम काळोखे, आर्या काकडे-जोशी, सिद्धेश लिंगायत हे कलाकार आहेत.

चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद नितीन विजय सुपेकर यांचे आहेत. निर्माते बाळासाहेब फाळके आणि हिंदवी फाळके तर सहनिर्माते यश मनोहर सणस आहेत. छायांकन योगेश कोळी तर संकलन नितेश राठोड यांचे आहे. संगीत रोहित नागभिडे, विजय गवंडे यांचे आहे.

## एचडीएफसी एर्गोच्या ऑप्टिमा लाइटमुळे देशभरात आरोग्य विमा बनणार अधिक किफायतशीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स या भारताच्या आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील जनरल इन्शुरन्स कंपनीने ऑप्टिमा लाइट लॉन्च केल्याचे जाहीर केले आहे. हे एक अनोखे आरोग्य विमा सोल्यूशन आहे, जे अगदी परवडण्याजोग्या प्रीमियममध्ये कव्हरेज प्रदान करते. ही योजना लॉन्च करून देशातील लोकांसाठी आरोग्य विमा अधिक किफायतशीर आणि सहजप्राप्य बनवण्याचा कंपनीचा उद्देश आहे.ऑप्टिमा लाइट हा माय: ऑप्टिमा सुरक्षित या एचडीएफसी एर्गोच्या मुख्य आरोग्य विमा उत्पादनाचा एक प्रकार आहे. माय: ऑप्टिमा सुरक्षित ही भारतातील एक अत्यंत लोकप्रिय आरोग्य विमा योजना आहे. ऑप्टिमा लाइट योजनेअंतर्गत मूळ विमा रक्कम 5 आणि 7.5 लाख रु. आहे. ग्राहक या योजनेअंतर्गत एक वर्षातील मूळ विमा रकमेच्या अमर्यादित पुनर्संचयनासह अवयव दान करण्याचा खर्च, घरच्या घरी हॉस्पिटलाईझेशन, इमर्जन्सी ॲम्ब्युलन्स (सडक आणि हवाई) यांसारखे लाभ देखील प्राप्त करू शकतात.

ऑप्टिमा लाइटच्या लॉन्च बरोबरच एचडीएफसी एर्गोने तीन नवीन दाखल केल्याचे जाहीर केले आहे. हे ॲड-ऑन्स ग्राहक ऑप्टिमा सिक्यॉर आणि ऑप्टिमा रिस्टोअर यांसारख्या आपल्या वर्तमान एचडीएफसी एर्गो आरोग्य विमा सोल्यूशनशी देखील जोडून घेऊन शकतात.

- अमर्याद: पॉलिसीच्या कालावधीत निर्दिष्ट केलेल्या दाव्यांच्या संख्येसाठी अमर्याद विमा रक्कम.
- एबीसीडी क्रॉनिक केअर: दमा, रक्तदाब, कॉलेस्टेरॉल, मधुमेह यांसारख्या जुनाट रोगांसाठी 30-दिवसांच्या प्रतीक्षा अवधीनंतर कव्हरेज उपलब्ध.
- पालकत्व: मातृत्व, आयव्हीएफ आणि गर्भ गोठवण्यासाठी कव्हरेज प्रदान करते.

वरील ॲड-ऑन्स फेब्रुवारी 2025 मध्ये भारतीयांसाठी उपलब्ध होतील. शिवाय, आरोग्य विषयक निकडींसाठी ग्राहकांना अथ ते इति सोय व्हावी या उद्देशाने एचडीएफसी एर्गो आपल्या सर्व आरोग्य विमा सोल्यूशन्ससाठी 'पोस्ट-हॉस्पिटलाईझेशन कॅशलेस क्लेम्स' हे फीचर लॉन्च करत आहे. या फीचर अंतर्गत ग्राहकांना हॉस्पिटलाईझेशननंतरच्या औषधांची कॅशलेस डिलिव्हरी आपल्या दाराशी मिळेल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी, ग्राहकांना हॉस्पिटलाईझेशननंतरची प्रिस्क्रिप्शन्स एचडीएफसी एर्गोच्या हिअर ॲप मध्ये अपलोड करावी लागतील. हे ॲप म्हणजे या विमा कंपनीची अनोखी विमा-प्रेरित ईकोसिस्टम आहे. एचडीएफसी एर्गोच्या वैद्यकीय टीमद्वारा योग्य तपासणी झाल्यानंतर, ती औषधे विमा कंपनीच्या पार्टनर ई-फार्मसीमार्फत ग्राहकांच्या दारी पोहोचवण्यात येतील. अशाप्रकारे, हॉस्पिटलाईझेशननंतर लिहून दिलेली औषधे विनासायास मिळू शकतील.

एचडीएफसी एर्गो ची ही अनोखी सेवा ग्राहक सेवेच्या प्रती असलेली कंपनीची वचनबद्धता अधिक बळकट करेल आणि आपल्या ग्राहकांना अधिक सोय-सुविधा प्रदान करेल अशी आशा आहे. प्रस्तुत नवीन लॉन्च झालेल्या आरोग्य सोल्यूशन्सविषयी बोलताना एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्सचे डायरेक्टर आणि चीफ बिझनेस ऑफिसर पार्थनील घोष म्हणाले, "अंतिम टोकापर्यंत आरोग्य सेवेची सुविधा पोहोचवण्यासाठी आणि आरोग्य-संबंधी इमर्जन्सीच्या विरुद्ध ग्राहकांच्या जीवनात सुविधा आणण्यासाठी एक महत्त्वपूर्ण हितधारक म्हणून आम्ही एचडीएफसी एर्गोमध्ये नवीन आरोग्य विमा सोल्यूशन प्रदान करत आहोत. ही सोल्यूशन्स अंतिम टोकापर्यंत आरोग्य विम्यात समावेशासाठी मदत करू शकतात.

# हंगामा ओटीटी सादर करते 'पर्सनल ट्रेनर'

### सस्पेन्स आणि षड्यंत्राची कथा

### पर्सनल ट्रेनर, रहस्य, सस्पेन्स आणि मुंबईच्या ग्लॅमरस जिम कल्चरची आकर्षक कथा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्म पैकी एक असलेल्या हंगामा आपली नवी मालिका घेऊन सज्ज झाले आहे. हंगामा OTT वर 28 जानेवारी 2025 रोजी त्यांची नवीन "पर्सनल ट्रेनर" ही क्राइम थ्रिलर मालिका प्रदर्शित होणार आहे. यात मुख्य भूमिकेत ब्युटिफुल टिना दत्ता दिसणार आहे. टिनासह यात गुलशन नैन आणि साहिब तग्रा अशी तगडी स्टारकास्ट झळकणार आहे. मुंबईच्या उच्चभ्रू जिम संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर या मालिकेची कथा फिरते. या मालिकेच्या केंद्रस्थानी नेहा धर्मराजन आहे. जिची भूमिका टिना दत्ता साकारत आहे. ही मालिका महत्त्वाकांक्षा, प्रेम आणि शारीरिक गरजापूर्ण करताना धोकादायक वळणांचा शोध घेते. या कथेत टिना दत्ता नेहा धर्मराजन या विवाहित महिलेच्या मुख्य भूमिकेत आहे, जिचे तिच्या पर्सनल ट्रेनर असलेल्या अनीश सोबत विवाहबाह्य संबंध असतात. अनिशची भूमिका गुलशन नैन यांनी साकारली आहे. एक सीक्रेट लव्हस्टोरी म्हणून सुरू झालेली ही प्रेमकथा अनिशच्या रहस्यमय मृत्यूने संपते. ही मालिका जीममधील सीक्रेट आणि छुपे अजेंडे यांच्या असलेल्या जाळ्यांमुळे प्रत्येकाला संशयाच्या भोवऱ्यात उभे करते. या शोबद्दल बोलताना हंगामा डिजिटल मीडियाचे सीईओ सिद्धार्थ रॉय म्हणाले, "आमची नवीन क्राईम थ्रिलर मालिका 'पर्सनल ट्रेनर'च्या ही तुम्हाला मालिका त्याच्या असलेल्या ट्विस्ट आणि टर्न्समुळे गुंतवून ठेवले. मानवी स्वभावाच्या गुंतागुंतीचा शोध यात घेण्यात आला आहे." टिना म्हणाली, "नेहा ही भूमिका मी आतापर्यंत साकारलेल्या सर्व भूमिकांपेक्षा सर्वात आव्हानात्मक आहे. कथेतील प्रत्येक ट्विस्टने मला अर्लट ठेवले आणि तिच्या प्रवासाच्या अनेक छटा पाहून मी खूप भावनिक झाले. प्रेक्षकांना ही मालिका नक्की भुरळ पाडेल त्यांच्या प्रतिक्रियांची मी आतुरतेने वाट पाहत आहे." गुलशन नैन आपल्या भूमिकेबाबत सांगताना म्हणाले, "पर्सनल ट्रेनर ही एक कथा आहे जी खरोखरच प्रेरणादायी आहे. ही भूमिका मला ऑफर झाल्यावर, पटकथा वाचण्यापूर्वीच मी अमित खन्नाच्या दृष्टिकोनावर सहज विश्वास ठेवला. मी मालिकेच्या विचारशील लेखनाकडे आणि दिग्दर्शनाकडे आकर्षित झालो. मला खात्री आहे की कथेमध्ये असलेली भावनिक प्रामाणिकता प्रेक्षकांवर कायमची छाप सोडेल." साहिब तग्रा म्हणतात, "पर्सनल ट्रेनर ही एक अशी कथा आहे जी खरोखरच प्रेरणादायी आणि प्रामाणिक आहे, संघर्ष, आकांक्षा आणि नातेसंबंधांच्या वास्तविक जीवनातील थीममध्ये खोलवर जाते.

ती आपल्या सर्वांना भेडसावणाऱ्या आव्हानांचा शोध घेते. या प्रोजेक्टवर काम करणे हा एक समृद्ध प्रवास होता आणि मला विश्वास आहे की कथेतील भावना आणि प्रामाणिकपणा प्रेक्षकांशी वैयक्तिक पातळीवर खरोखरच जोडला जाईल."

हंगामा OTT वर 28 जानेवारी 2025 रोजी प्रीमियर झालेला पर्सनल ट्रेनर पाहायला विसरू नका. सर्व भाग पाहण्यासाठी हंगामा ॲप आजच डाउनलोड करा.

ही मालिका आता हंगामा आणि भागीदार प्लॅटफॉर्मवर केवळ Tata Play Binge, Watcho, BSNL, PlayboxTV, RailWire Broadband, Airtel Xstream Play, आणि Dor Tv वर प्रवाहित होत आहे.



# 'जीबीएस'ची रुग्णसंख्या १३० अन् आतापर्यंत २ मृत्यू



- **आरोग्य सचिवांकडून यंत्रणांची झाडाझडती**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) रुग्णसंख्या १२७ वर पोहोचली असून, आतापर्यंत दोन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. सध्या २० रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. दरम्यान, राज्याचे आरोग्य सचिव निपुण विनायक यांनी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत एका बैठकीत पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. पुण्यात जीबीएसची रुग्णसंख्या वाढल्याने आरोग्य सचिव निपुण विनायक हे गुरुवारी पुण्यात दाखल झाले. त्यांनी औंध जिल्हा रुग्णालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट दिली. या दोन्ही रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांची पाहणी त्यांनी केली. याचबरोबर रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडून माहिती घेतली. रुग्णांवरील उपचार आणि औषधांच्या उपलब्धतेबाबत त्यांनी डॉक्टरांना सूचना केल्या, अशी माहिती सूत्रांनी दिली. आरोग्य सचिवांनी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेला भेट दिली. तिथे त्यांनी संस्थेतील शास्त्रज्ञ, शीघ्र प्रतिसाद पथक, केंद्रीय उच्चस्तरीय पथक आणि आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ होण्यामागील कारणांबाबत त्यांनी एनआयव्हीतील शास्त्रज्ञांसोबत चर्चा केली. याचबरोबर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सूचना केल्या, अशी माहिती सूत्रांनी दिली. राज्यात 'जीबीएस'चे १३० रुग्ण झाले आहेत. पुणे महापालिका क्षेत्रात २५ रुग्ण असून, रुग्ण महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील ७४ आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात १३, पुणे ग्रामीणमध्ये ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण पुण्यात आहेत. राज्यात सर्वाधिक रुग्ण २० ते ३९ वयोगटातील आहेत. दरम्यान, राज्यातील ७३ रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. आरोग्य विभागाने शहराच्या विविध भागांतील १५४ नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविले होते. त्यापैकी ८ पाणी नमुने पिण्यास अयोग्य आढळले आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

**महाराष्ट्रात लवकरच ५ कोटी वृक्षांची लागवड करून शेतकऱ्यांना 'कार्बन क्रेडिट' मिळवून उत्पन्न मिळवून देण्याचा कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून**

# स्वान फाऊंडेशन व शाश्वत पालघर शेतकरी उत्पादक कंपनीचा उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

निसर्गाने कुठलारी खर्च न करता कार्बन कमी करण्याचे नैसर्गिक यंत्र दिले आहे. ते म्हणजे वृक्ष.एक झाड लाखो पटीने वातावरणातील कार्बन कमी करते. त्यामूळे ज्याने झाड लावले, संगोपन करून मोठे केले त्यांना कार्बन कमी करण्याचे क्रेडिट मिळायला हवे. झाडे लावा, जगवा आगि उत्पन्न मिळावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवून आणि देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या एक पेड मां के नाम या अभियानाने प्रेरित होऊन... एक पेड माँ के नाम... कार्बन क्रेडिट युवाओं के नाम... या उद्देशाने महाराष्ट्रात लवकरच ५ कोटी वृक्षांची लागवड करुन शेतकऱ्यांना 'कार्बन क्रेडिट'च्या माध्यमातून थेट शेतकयांना उत्पन्न मिळवून देण्याची मोहिम स्वान रिर्सच अँड सोशल स्टडी फाउंडेशन आणि शाश्वत पालघर शेती उत्पादक कंपनी यांच्या संयुक्तविद्यमाने मोहीम सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती स्थान फाउंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे, सचिव सांरग नेरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी, सायबर तज्ज्ञ असंग रामटेके, अजित कारके, विकास सोनकांबळे, रत्नदिप सरवदे उपस्थित होते.

शशिकांत कांबळे पुढे म्हणाले, राज्यात औद्यागिकीकरण वाढत असत्यामूळे होणारी पर्यावरणाची हानी टाळतानाच शेतकरी, संस्था , व नागरिकांना उत्पन्नाचा स्रोत' ठरणारी ही मोहिम असेल, शेतकऱ्यांना आपल्या शेतात, संस्थाना आवारात आणि सामान्य नागरिकांना मुबलक जागा असेल तर झाडे लावून कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून २० वर्ष उत्पन्न मिळवता येईल.

स्वान फाऊंडेशनचे सचिव व शाश्वत पालकार शेती उत्पादक. कंपनीचे संचालक सांरंग नारनेरकर टोरंटो विद्यापीठातून यांनी इलेट्रिकल आणि कॉम्प्यूटर इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली असून विद्यार्थी दशेतच अनेक क्षेत्रात त्यांनी संशोधन केले आहे. स्पेस आणि मिशन प्लेनिगमध्ये संशोधन करून त्याचे सादरीकरण बापार व्हॉएजर नावाच टूल बनवल्यानंतर त्याच सादरीकरण नासा समोर करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. आतापर्यंत 13 पेटेस त्यांच्या नावावर आहेत.

सारंग नेरकर यावेळी बोलताना म्हणाले, जागतिक तापमानात वाढ. रोखण्यासाठी व पुढील पिढीला शुद्ध हवा, शुद्ध पाणी मिळण्यासाठी कार्बन क्रेडिट आवश्यक आहे. चीन २८%, अमेरिका १५%, भारत ७% रशिया ५%, जपान ३% युरोपीयन देश २२%, ही स्थिती बदलण्यासनि मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑकमाइज्चे स्थिरीकरण होणे आवश्यक आहे. जागतिक बँकेच्या ग्लोबल यूथच्या क्लायमेट नेटवर्कच्या भारतासाठीचा हवामान इव दूत म्हणून काम करताना कृषि क्षेत्रामध्ये AI तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना कसे जास्त उत्पन्न मिळवू शकते यावर जास्त प्रमाणात लक्ष केद्रित केले. यातूनच कार्बन क्रेडिट च्या माध्यमातून थेट शेतकयांना कसे उत्पन्न मिळेल यासाठी आम्ही २०२१ मध्ये काम सुरु केले. वृक्ष लागवड झाल्यानंतर झाडाचे मूल्यमापन करण्यासाठी मी AI तंत्रज्ञाना वर आधारित एक तंत्रज्ञान विकसित केले व त्याचे पेंट्स घेतले. शेतकऱ्यांना थेट उत्पन्न मिळण्यासाठी शेतकयांची भागिदारी असलेली शाश्वत पालघर शेती उत्पादक कंपनी जागतिक बँकेच्या मार्गदर्शना खाली रजिस्टर केली व पालघर कार्बन क्रेडिटचा पायलट प्रकल्प सुरु केला. आजमितीला ८,५०० शेती शेतकरी सहभागी असून १५ लाख झाडांची लागवड झाली आहे. या कार्बन क्रेडिटचे ऑडिट होऊन शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील. या यशस्वी प्रयत्नानंतर आम्ही महाराष्ट्रात लवकरच 5कोटी झांडाची लागवड करून थेट शेतकऱ्यांच्या अंकाऊटला पैसे जमा करणार आहोत.

**विकास सोनकांबळे म्हणाले की, ज्या २०२१ नंतर ज्या शेतकऱ्यांनी वृक्ष लागवड केली आहे. अशा शेतकयांना देखिल कार्बन क्रेडिट चा लाभ घेता येणार आहे. ही कार्बन क्रेडिट थी मोहम जास्तीत ' जास्त लोकाभिमुख करण्यासाठी व येणाऱ्या वर्षभरात 5कोटी वृक्ष लागवडीच्या माध्यमातून लाखो शेतकयांना उत्पन्न मिळणार आहे. या साठी आपल्या माध्यमातून आम्ही आवाहन करत आहोत करत आहोत की मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहभागी व्हावे.**




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.